# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : ९ सप्टेंबर २०१९

## ( बैठक क्र. २३७ )

| अ.क्र. | विषय | विभागाचे नाव |
|---|---|---|
| १ | लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील वॉटर ग्रीडसाठी ३१२२ कोटीच्या निविदा | पाणी पुरवठा व स्वच्छता |
| २ | महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सोलापूर विद्यापीठात स्थापणार | उच्च व तंत्र शिक्षण |
| ३ | मुंबईमध्ये १६ समर्पित व्यावसायिक न्यायालये स्थापन करण्यास मान्यता | विधि व न्याय |
| ४ | विदर्भ-मराठवाड्यातील शेतकऱ्यांना लाभ<br>सावकारांनी परवाना क्षेत्राबाहेर दिलेले शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय | सहकार |
| ५ | कुष्ठरोग पीडितांसाठी मुख्यमंत्री आवास योजना | गृहनिर्माण |
| ६ | शासकीय अध्यापकांसाठी प्रशिक्षण संस्था स्थापन्याचा निर्णय | उच्च व तंत्रशिक्षण |
| ७ | तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संस्थांमधील शिक्षकीय, समकक्ष पदांना सातवा वेतन आयोग | उच्च व तंत्र शिक्षण |
| ८ | राजूर येथे दिवाणी न्यायाधीश व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय | विधि व न्याय |
| ९ | वैद्यकीय अध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू | वैद्यकीय शिक्षण |
| १० | मुंबईतील शुश्रुषा रूग्णालयाला २५ कोटींचे भाग भांडवल मिळणार | सहकार विभाग |
| ११ | पीएचडीधारक अध्यापकांना १९९६ पासून दोन वेतनवाढी | उच्च व तंत्र शिक्षण |
| १२ | कुंभारी येथील विडी कामगारांच्या गृहनिर्माण संस्थांना अकृषिक आकारणीतून सूट | महसूल |
| १३ | रिसर्च फॉर रिसर्जन्स फाऊंडेशनचे मुद्रांक व नोंदणी शुल्क माफ | महसूल |
| १४ | मोशी येथील ५ एकर जमीन मुस्लीम दफनभूमीसाठी प्रदान | महसूल |
| १५ | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांसाठी गौण खनिजांवरील स्वामित्वधन माफ | सार्वजनिक बांधकाम |
| १६ | पालघर जिल्हा मुख्यालयातील कामाच्या मोबदल्यात सिडकोला केळवे येथील जमीन | महसूल |
| १७ | कृषी व ग्रामीण परिवर्तनासाठी राज्यात स्मार्ट प्रकल्प राबविणार | कृषी |

| | | |
|---|---|---|
| १८ | विदर्भ, मराठवाड्यातील १९ जिल्ह्यात कुक्कुट विकासाचा कार्यक्रम राबविणार | पदूम |
| १९ | शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये एका व्यक्तीस एकच घर मिळण्यासाठी धोरण | गृहनिर्माण |
| २० | महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अध्यादेश २०१९ ला मान्यता | वैद्यकीय शिक्षण |
| २१ | वाघूर प्रकल्पास मिळणार जास्तीचा निधी | जलसंपदा |
| २२ | हतनूर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यास चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता | जलसंपदा |
| २३ | वरणगांव तळवेल परिसर सिंचन योजनेस पहिली सुधारीत प्रशासकीय मान्यता | जलसंपदा |
| २४ | भातसा प्रकल्पास १४९१ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता | जलसंपदा |
| २५ | शेळगाव बॅरेज प्रकल्पास दुसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता | जलसंपदा |
| २६ | चिमूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय | महसूल |
| २७ | औरंगाबाद व संगमनेरमधील विधि महाविद्यालयांना अनुदान मंजूर | उच्च व तंत्रशिक्षण |
| २८ | अन्न सुरक्षा आयुक्तांच्या निर्णयावर दुसरे अपील शासनाकडे करता येणार | वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये |
| २९ | दिव्यांगांच्या खाजगी प्रशिक्षण संस्थांना मिळणार एकवेळचे अनुदान | कौशल्य विकास व उद्योजकता |
| ३० | दीर्घकाळ शासकीय वैद्यकीय सेवा देऊ इच्छिणाऱ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश आरक्षण | वैद्यकीय शिक्षण |
| ३१ | मानसिक आरोग्यासंदर्भातील अभ्यासक्रमांसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करणार | सार्वजनिक आरोग्य |
| ३२ | जयताळा येथील आरक्षण फेरबदलास मंजुरी | नगर विकास |
| ३३ | विस्थापित वसाहतीतील निवासी, वाणिज्यिक हस्तांतरणे नियमानुकूल करण्याबाबत मंत्रिमंडळ उपसमिती | मदत व पुनर्वसन |
| ३४ | देहरजी मध्यम प्रकल्प एमएमआरडीएच्या अर्थसहाय्यातून राबविणार | जलसंपदा विभाग |

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील
## वॉटर ग्रीडसाठी ३१२२ कोटीच्या निविदा

मराठवाडा वॉटर ग्रीड अंतर्गत लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांसाठी प्रस्तावित ग्रीडच्या मुख्य व दुय्यम जलवाहिन्या, जलशुद्धीकरण यंत्रणा आदी कामांसाठी ३ हजार १२२ कोटींच्या पहिल्या प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हायब्रीड ॲन्युटी तत्त्वावर या कामांसाठी निविदा (Request for Qualification) काढण्यात येणार आहे.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीत वॉटर ग्रीड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या योजनेसाठी पूर्वव्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी गेल्या वर्षी निविदा काढण्यात आली होती. त्यानुसार इस्त्रायल शासनाच्या मेकोरोट डेव्हलपमेंट अँड एंटरप्रायजेस कंपनी सोबत करार करण्यात आला. या करारानुसार सहा टप्प्यात विविध अहवाल व १० प्राथमिक संकलन अहवाल असे सर्व अहवाल फेब्रुवारी २०२० पर्यंत सादर करण्यात येणार आहेत. या कार्यवाही अंतर्गत लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यासाठी पहिला व दुसरा प्राथमिक संकलन अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यात लातूर जिल्ह्यासाठी १११.२८ कि.मी. एमएस पाईप तर ४९५.८५ कि.मी. डीआय पाईप लाईन अशी एकूण ६०७.१३ कि.मी. पाईप लाईन प्रस्तावित आहे. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यासाठी ३७.९२ कि.मी. एमएस पाईप तर ६६५.७५ कि.मी. डीआय पाईप लाईन अशी एकूण ७०३.६७ कि.मी. पाईप लाईन प्रस्तावित आहे. लातूर जिल्ह्यासाठी १७१२.९१ कोटी आणि उस्मानाबाद जिल्ह्यासाठी १४०९.५७ कोटी अशी एकूण ३ हजार १२२ कोटी १८ लाख किंमत प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यासाठी हायब्रिड ॲन्युटी मॉडेलवर निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पद्धतीच्या निविदेमध्ये संभाव्य निविदाकारांनी भांडवली गुंतवणूक करणे अपेक्षित असून काही प्रमाणात निधी शासनाकडे देणे प्रस्तावित आहे.

-----०-----

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र
## सोलापूर विद्यापीठात स्थापणार

महात्मा बसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान अभ्यासण्यासह त्याच्या सध्याच्या काळातील प्रासंगिकतेसंदर्भात संशोधन करण्यासाठी सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठात नवीन पदनिर्मिती न करण्याच्या अधीन राहून २०१९-२० या वर्षापासून या केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वर यांचे तत्त्वज्ञान अभ्यासण्यासह समकालासंदर्भात त्याच्या प्रासंगिकतेचे अन्वेषन करण्यात येणार आहे. तसेच भारतातील जात इतिहास, सामाजिक-सांस्कृतिक समता, धर्म आणि समाज, पितृसत्ता आणि स्त्रिया, जात आणि शिक्षण, नव्या सामाजिक चळवळी, जात, संस्कृती आणि वर्चस्व आदी क्षेत्रात संशोधन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या अध्यासन केंद्राचे उपक्रम आणि कार्यक्रमांद्वारे तरुण पिढीला महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आणि त्यांची सध्याच्या काळातील प्रासंगिकतेची माहिती करुन देण्यात येणार आहे.

-----०-----

विधि व न्याय विभाग

## मुंबईमध्ये १६ समर्पित व्यावसायिक न्यायालये स्थापन करण्यास मान्यता

मुंबईमध्ये सोळा समर्पित व्यावसायिक न्यायालये स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. नगर दिवाणी व सत्र न्यायालय येथे ११ आणि दिंडोशी येथे पाच अशी ही सोळा न्यायालये स्थापन करण्यात येणार असून यासाठी ११२ पदांच्या निर्मितीच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली. व्यावसायिक सुलभतेसाठी राज्य शासनाने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

राज्य शासनाला उच्च न्यायालयाच्या सहमतीने विशेष न्यायालय स्थापण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार मुंबईतील नगर दिवाणी व सत्र न्यायालय येथे ११ व दिंडोशी येथे ५ व्यावसायिक न्यायालयांसाठी १५ डिसेंबर २०१८ रोजी अधिसूचना काढण्यात आली आहे. तथापि, ही न्यायालये असमर्पित असल्याने समर्पित (dedicated) स्वरूपाचे व्यावसायिक न्यायालय आवश्यक होते. त्यानुसार नगर दिवाणी व सत्र न्यायालय येथे ११ व दिंडोशी येथे पाच अशी १६ समर्पित व्यावसायिक न्यायालये स्थापन करण्यास आणि त्यासाठी ११२ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे. या पदांमध्ये प्रत्येक न्यायालयास एक जिल्हा न्यायाधीश, लघुलेखक (उच्चश्रेणी), शिरस्तेदार, लिपिक-टंकलेखक, दुभाषी, शिपाई अशी सात पदे असणार आहेत. त्यासाठी ८ कोटी ९४ लक्ष ६८ हजार इतक्या खर्चासही मान्यता देण्यात आली. या न्यायालयांमुळे व्यवसाय सुलभतेसाठी मोलाची मदत होणार असून जागतिक क्रमवारीतील या संदर्भातील निर्देशांकात देशाचे स्थान उंचावण्यास मदत होणार आहे.

-----०-----

सहकार विभाग

विदर्भ-मराठवाड्यातील शेतकऱ्यांना लाभ

## सावकारांनी परवाना क्षेत्राबाहेर दिलेले शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय

विदर्भ व मराठवाड्यातील परवानाधारक सावकारांनी परवान्यात नमूद केलेल्या क्षेत्राच्या बाहेरील शेतकऱ्यांना दिलेली कर्जे माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

विविध नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेली कर्जे माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने एप्रिल २०१५ मध्ये घेतला होता. या निर्णयानुसार १९ जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या मंजुरीनुसार ३१ मार्च २०१८ पर्यंत ४६ हजार ७३५ शेतकऱ्यांची ५५ कोटी ९६ लाख ६५ हजार रुपयांची मुद्दल आणि १० कोटी ५९ लाख ७३ हजार रुपयांचे व्याज असे एकूण ६६ कोटी ५६ लाख ३८ हजार रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले आहेत. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्जापोटी १३९३ सावकारांना वितरित करण्यात आली आहे.

या योजनेची अंमलबजावणी करताना १० एप्रिल २०१५ च्या शासन निर्णयातील अट क्र. १ (३) नुसार परवानाधारक सावकाराने त्याच्या परवाना क्षेत्राबाहेरील व्यक्तीस दिलेले कर्ज अपात्र ठरले. त्यानुसार तालुका आणि जिल्हास्तरीय समित्यांनी कर्जदार शेतकऱ्यांच्या प्राप्त याद्यांच्या आधारावर कार्यक्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या शेतकऱ्यांना अपात्र ठरविले होते. अशा कर्जदार शेतकऱ्यांना सावकारी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यासाठी कार्यक्षेत्राची अट एक वेळेस शिथिल (One Time Relaxation) करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार एप्रिल २०१५ च्या शासन निर्णयातील परवानाधारक सावकाराने परवान्यात नमूद केलेल्या क्षेत्राच्या बाहेरील व्यक्तीस दिलेले कर्ज या योजनेत पात्र राहणार

नसल्याची अट शिथिल करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यामुळे परवानाधारक सावकाराने परवान्यात नमूद केलेल्या क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यास दिलेले ३० नोव्हेंबर २०१४ पर्यंतचे कर्ज वैध ठरणार आहे. तसेच याद्यांच्या तपासणी किंवा पुनर्तपासणीनंतर मूळ योजनेच्या इतर सर्व अटी व शर्तींप्रमाणे योग्य असणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रकरणास योजनेचा लाभ मिळणार आहे.

आजच्या निर्णयानुसार अट शिथिल केल्यामुळे मूळ याद्यांमध्ये समाविष्ट कार्यक्षेत्राच्या बाहेरच्या अपात्र ठरविण्यात आलेल्या कर्जदार शेतकऱ्यांच्या प्रकरण तपासणी किंवा फेरतपासणीनंतर जिल्हास्तरीय समितीने ज्या दिनांकास कर्जमाफी प्रस्तावास मान्यता दिली आहे, त्या दिनांकापर्यंत सावकारास कर्ज व त्यावरील व्याज देण्यात येणार आहे. यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण करण्यासाठी ३१ मार्च २०२० पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

-----०-----

गृहनिर्माण विभाग

## कुष्ठरोग पीडितांसाठी मुख्यमंत्री आवास योजना

राज्यातील कुष्ठरोग पीडितांना घरे उपलब्ध होण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेशिवाय जास्तीचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री आवास योजना राबविण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या सुमारे २.६४ टक्के दिव्यांग (अपंग) लोकसंख्या आहे. त्यापैकी सुमारे ८ टक्के लोकसंख्या ही कुष्ठपीडित आहे. या कुष्ठपीडित नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मागणी अथवा बांधण्याचा अर्ज केला असल्यास अशा व्यक्तींना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मिळणाऱ्या अडीच लाख रुपये अनुदानाव्यतिरिक्त अतिरिक्त दीड लाख रुपये इतके अनुदान उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री आवास योजना राबविण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या कुष्ठपीडित नागरिकांना मुख्यमंत्री आवास योजनेचे लाभ देण्यात येतील. या योजनेच्या अटींची पूर्तता करणारा लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २.५० लाख रुपये अनुदान आणि मुख्यमंत्री आवास योजनेचे १.५० लाख रुपये अतिरिक्त अनुदान अशा एकूण ४ लाखांच्या अनुदानास पात्र असेल. तसेच प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत सर्व सवलती या योजनेस लागू राहतील.

अनुसूचित जातीच्या कुष्ठपीडित व्यक्तींसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत, अनुसूचित जमातीच्या कुष्ठपीडित व्यक्तींसाठी आदिवासी विकास विभागामार्फत तर उर्वरित गटातील कुष्ठपीडित व्यक्तींसाठी गृहनिर्माण विभागामार्फत महाराष्ट्र निवारा निधीमधून दीड लाख रुपयांचे अतिरिक्त अनुदान देण्यात येईल.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## शासकीय अध्यापकांसाठी प्रशिक्षण संस्था स्थापन्याचा निर्णय

उच्च शिक्षणातील नव्या बदलांचा अध्यापकांना परिचय व्हावा तसेच विद्यापीठे व तंत्र शिक्षण विभागातील अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेचा विकास व्हावा यासाठी अध्यापक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

उच्च शिक्षण पध्दतीमध्ये कालानुरुप बदल होत असून त्यानुसार व्यावसायिक व रोजगारक्षम शिक्षणाला महत्त्व प्राप्त होत आहे. उद्योगाला तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज मोठ्या प्रमाणावर भासू लागल्यामुळे जागतिक पातळीवरील गुणवत्ता, ज्ञानसंवर्धन, ज्ञानशक्तीची वाढ आणि या वाढीसाठी केलेले संशोधन याचा समावेश अभ्यासक्रमांमध्ये होऊन त्यादृष्टीने शिकविण्याच्या पध्दतीमध्ये बदल होणे अपेक्षित आहे. त्याकरिता तज्ज्ञ अध्यापक वर्ग निर्माण होणे गरजेचे असून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या व नव्याने नियुक्त होणाऱ्या अध्यापकांकरिता एक सर्वसमावेशक केंद्रीय प्रशिक्षण योजना तयार करण्यात आली असून अध्यापक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या संस्थेत अध्यापकांच्या व्यावसायिक पात्रता वाढीसाठी प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम विकसित करण्यात येणार असून उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील शिक्षकांना उद्योग, व्यवसाय व त्यांच्या संबंधित क्षेत्राचे अद्ययावत ज्ञान, शैक्षणिक पध्दती, तंत्रज्ञान यांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये झालेल्या बदलांच्या आधारे प्रशिक्षणाची परिणामकारकता तपासून प्रशिक्षण पध्दतीमध्ये गरजेनुसार बदल करण्यात येणार असून तंत्रज्ञानाचा वापर करुन मोठ्या प्रमाणात अध्यापकांच्या प्रशिक्षणाची संमिश्रित पद्धत अवलंबिण्यात येणार आहे.

-----o-----

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संस्थांमधील शिक्षकीय, समकक्ष पदांना सातवा वेतन आयोग

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील १३३ शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांमधील ३,५२८ शिक्षकीय व समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जाहीर केल्याप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील १३३ शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील ३,५२८ शिक्षकीय व समकक्ष पदांना ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या कार्यरत शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील विविध शिक्षकीय पदे व ग्रंथपालांना तंत्रशिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या सुधारित वेतन संरचना व त्यानुसार देय ठरणारा महागाई भत्तादेखील दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

विधि व न्याय विभाग

## राजूर येथे दिवाणी न्यायाधीश व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय

अहमदनगर जिल्ह्यातील राजूर येथे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर येथे न्यायालय स्थापन झाल्याने परिसरातील नागरिकांची व पक्षकारांची गैरसोय दूर होईल. तसेच न्यायदान प्रक्रिया जास्त लोकाभिमुख होण्यास मदत होणार आहे. या बैठकीत न्यायालयाकरिता आवश्यक असणारी एकूण १६ पदे (१४ नियमित व २ काल्पनिक पदे बाह्ययंत्रणेद्वारे) निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. हे न्यायालय त्यासंबंधीची अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अस्तित्वात येईल.

-----o-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## वैद्यकीय अध्यापकांना
## सातवा वेतन आयोग लागू

राज्यातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय तसेच आयुष संचालनालय अधिनस्त अध्यापकीय पदांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या अध्यापकांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच थकबाकी देण्यात येणार आहे.

राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद महाविद्यालयांमधील पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, अधिष्ठाता तसेच नागपूर येथील शासकीय भौतिकोपचार व्यवसायोपचार विद्यालयांमधील पूर्णवेळ अध्यापक, तसेच वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयातील सहसंचालक व संचालक तसेच आयुष संचालनालयातील संचालकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केल्यानुसार सातव्या वेतन आयोगाच्या तरतुदी लागू करण्यास आज मंजुरी देण्यात आली. यासाठी ४८५ कोटी ६० लाख ४ हजार इतक्या अतिरिक्त वार्षिक आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

-----o-----

सहकार विभाग

## मुंबईतील शुश्रुषा रूग्णालयाला
## २५ कोटींचे भाग भांडवल मिळणार

मुंबईतील शुश्रुषा सिटीझन को-ऑपरेटिव्ह हॉस्पिटल या संस्थेला रूग्णसेवा व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २५ कोटी रूपयांचे भागभांडवल उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. हे भागभांडवल टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शुश्रुषा रूग्णालयात दरवर्षी सुमारे ६० हजार बाह्य रूग्णांना व सहा हजार आंतररूग्णांना सेवा पुरविली जाते. दारिद्र्यरेषेखालील रुग्णांना मोफत तसेच गरीब रूग्णांना सवलतीच्या दरात सेवा उपलब्ध करून देणाऱ्या या रूग्णालयाला १९६६ ते १९८८ दरम्यान सहकार खात्यातर्फे पाच टप्प्यात उपलब्ध करून देण्यात आलेले पंधरा लाख रूपयांचे भाग भांडवल संस्थेने परत केले आहे. संस्थेच्या सेवा विस्तारासाठी अधिकच्या भागभांडवलाची आवश्यकता होती. त्यासाठी २५ कोटी रूपयांचा प्रस्ताव शासनाने मान्य केला आहे.

-----o-----

उच्च व तंत्र शिक्षण

## पीएचडीधारक अध्यापकांना १९९६ पासून दोन वेतनवाढी

राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील ज्या अधिव्याख्यात्यांनी १ जानेवारी १९९६ पूर्वी पीएच.डी पूर्ण केली आहे, त्यांना १ जानेवारी १९९६ पासून दोन आगाऊ वेतनवाढी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या अध्यापकांना २७ जुलै १९९८ पासून या वेतनवाढी यापूर्वीच देण्यात आल्या होत्या.

राज्यातील पीएच.डी. अर्हताप्राप्त अधिव्याख्यात्यांना दोन वेतनवाढी मंजुर करण्यात आल्या होत्या. मात्र या वेतनवाढी १९९६ पासून करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यासाठी ५ कोटी २४ लाख ३८ हजार २२० इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

महसूल विभाग

## कुंभारी येथील विडी कामगारांच्या गृहनिर्माण संस्थांना अकृषिक आकारणीतून सूट

सोलापूर जिल्ह्यातील कुंभारी येथील विडी कामगारांच्या तीन गृहनिर्माण संस्थांना अकृषिक आकारणीतून सूट देण्यासह त्यांच्याकडील अकृषिक कराची थकबाकी व त्यावरील दंड माफ करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

सोलापूर जिल्ह्यात कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे कॉ. गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, माँ साहेब विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था आणि स्वामी समर्थ विडी कामगार सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था या तिन्ही संस्था नागरी क्षेत्र तसेच गावठाण क्षेत्राच्या बाहेरील जमिनीवर आहेत. या जमिनीचे क्षेत्रफळ सुमारे १५ लाख ६० हजार ३४५ चौ.मी. इतके आहे. या तिन्ही संस्थांच्या शेतजमिनी निवासी इमारत उपयोगासाठी अकृषिक वापरामध्ये परिवर्तित केल्या आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील तरतुदींनुसार प्राप्त अधिकारानुसार या तिन्ही सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या ताब्यातील जमीन शासन राजपत्रात अधिसूचित करुन त्यास अकृषिक आकारणीतून सूट देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, या तिन्ही संस्थांकडे आजवर असलेली अकृषिक कराची थकबाकी तसेच त्यावरील दंड माफ करण्यासदेखील मंजुरी देण्यात आली आहे. विडी कामगारांचे जीवनमान उंचावले जावे, त्यांच्या घराचा प्रश्न सोडवता यावा, याद्दष्टीने या सहकारी गृहनिर्माण संस्था विकसित करण्यात आल्या आहेत. अकृषिक आकारणीतून सूट दिल्याने या संस्थांतील कामगारांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

-----o-----

महसूल विभाग

## रिसर्च फॉर रिसर्जन्स फाऊंडेशनचे मुद्रांक व नोंदणी शुल्क माफ

रिसर्च फॉर रिसर्जन्स फाऊंडेशन या संस्थेकडून नागपूरमध्ये रिसर्च सेंटर उभारण्यात येणार असून या संस्थेची सामाजिक गरज आणि बांधिलकी लक्षात घेता, संस्थेच्या जमीन खरेदीखतावरील मुद्रांक शुल्क तसेच त्यावर देय असलेले नोंदणी शुल्क माफ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

नागपूर येथील रिसर्च फॉर रिसर्जन्स फाऊंडेशन ही सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियमाखाली नोंदणीकृत संस्था आहे. भारतीय वैज्ञानिक संशोधकांना योग्य ती संधी मिळवून देण्यासाठी संस्थेकडून संशोधन केंद्र (रिसर्च सेंटर) उभारले जाणार आहे. नियोजित संशोधन केंद्राद्वारे विविध क्षेत्रातील विषयांमध्ये संशोधन कार्य केले जाणार असल्याने त्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यामुळे व्यापक लोकहित लक्षात घेता, फाऊंडेशनकडून म्हसखापरा व झिलपा (ता. काटोल, जि. नागपूर) या ठिकाणी खरेदी करण्यात येणाऱ्या सुमारे १०५ हेक्टर आर जमिनीच्या अभिहस्तांतरण तसेच खरेदी खतावरील देय असलेले मुद्रांक शुल्क त्याचप्रमाणे या दस्तांचे नोंदणी शुल्क माफ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

-----०-----

महसूल विभाग

## मोशी येथील ५ एकर जमीन मुस्लीम दफनभूमीसाठी प्रदान

पुणे जिल्ह्यातील मोशी येथील ५ एकर जागा मुस्लीम दफनभूमीसाठी विनामूल्य प्रदान करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मोशी (ता. हवेली) येथील गट क्रमांक ६४६ मधील ५ एकर शासकीय जागेचा उपयोग मुस्लीम दफनभूमी या सार्वजनिक प्रयोजनासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेद्वारा करण्यात येणार आहे. या प्रयोजनातून महानगरपालिकेला कोणताही आर्थिक किंवा व्यावसायिक फायदा होणार नाही. सध्या या जागेवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मान्य विकास आराखड्यानुसार आरक्षण नसले तरी या जागेचा मुस्लीम दफनभूमी म्हणून सार्वजनिक वापर होणार आहे. यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४० च्या तरतुदीनुसार ही ५ एकर जागा महसूलमुक्त व भोगवटामूल्य विरहित पद्धतीने कब्जे हक्काने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस प्रदान करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

-----०-----

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांसाठी गौण खनिजांवरील स्वामित्वधन माफ

सार्वजनिक बांधकाम विभाग व या विभागाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात येणाऱ्या सर्व रस्ते, पूल, इमारती आणि अन्य योजनांच्या कामांसाठी लागणाऱ्या खडी, रेती, माती, मुरुम इत्यादी गौण खनिजांवरील स्वामित्वधन माफ करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत धरणामधील गाळ अथवा माती काढून ती शेतात पसरविण्यासाठी, तसेच पाझर तलाव व गाव तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी त्यांच्या बुडीत क्षेत्रातील गाळ काढून तो त्याच तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी वापरताना गाळ, माती यांच्यासाठी स्वामित्वधन, अर्ज शुल्क यामधून सूट देण्याचा निर्णय शासनाने ऑक्टोबर २०१७ मध्ये घेतला आहे. याच धर्तीवर केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत होत असलेल्या राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रमासाठी मालगुजारी तलावांचे खोलीकरण, नाला खोलीकरण-सरळीकरण, शेतकऱ्यांना शेततळी खोदून देणे या कामांमधून गौण खनिजे उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासंदर्भातील निर्णय नोव्हेंबर २०१७ मध्ये जाहीर करण्यात आला आहे. या दोन्ही शासन निर्णयातील आदेश आणि बाबीही सार्वजनिक बांधकाम विभाग व त्यांच्या अंगीकृत उपक्रमांच्या सर्व कामांना लागू करण्यात आल्या आहेत.

-----०-----

महसूल विभाग

## पालघर जिल्हा मुख्यालयातील कामाच्या मोबदल्यात सिडकोला केळवे येथील जमीन

पालघर जिल्हा मुख्यालयातील विविध विभागांच्या जिल्हास्तरीय शासकीय इमारतींमधील अंतर्गत सजावट व फर्निचरची कामे सिडकोमार्फत करण्यास आणि त्याबदल्यात सिडकोला पालघर तालुक्यातील केळवे येथे जमीन विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा अस्तित्वात आला आहे. पालघर जिल्हा मुख्यालयाचा नियोजित विकास करुन विविध विभागांच्या जिल्हास्तरीय इमारती तसेच कर्मचारी निवासस्थाने, पायाभूत सुविधा यांची कामे सिडकोद्वारे करण्यात येत आहेत. सिडकोने या शासकीय कार्यालयातील अंतर्गत सजावटीसह फर्निचरचेही काम करुन द्यावे आणि त्याच्या खर्चाच्या बदल्यात केळवे स्थानकालगत असलेली दुग्ध व्यवसाय विभागाची सुमारे १०१ हेक्टर जमीन नवनगर विकसित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ११३ ए अन्वये सिडकोला विनामूल्य हस्तांतरित करण्यात यावी, या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे.

-----०-----

## कृषी व ग्रामीण परिवर्तनासाठी
## राज्यात स्मार्ट प्रकल्प राबविणार

राज्यातील कृषीपूरक उत्पादनांसाठी तसेच विविध पिकांच्या काढणीपश्चात हाताळणी, व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योग व बाजार जोडणी व्यवस्था राज्यात निर्माण करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये येत्या ६ वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) राबवण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यात कृषि मालाच्या विपणन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यास वाव असून कृषि उत्पन्न बाजार समित्यांव्यतिरिक्त अन्य पर्यायी बाजार सुविधांचा विकास करण्याचे प्रयत्न महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, ई-नाम योजना, तसेच पणन अधिनियमातील विविध सुधारणांद्वारे करण्यात आले आहेत.

राज्यातील सुमारे ५८१ शितगृहांची एकूण क्षमता सुमारे ९ लाख टन असून पूर्व-शीतकरण व शीतगृह सुविधायुक्त २०० पॅक हाऊसेस आहेत. त्याचप्रमाणे, अन्नधान्याच्या साठवणुकीसाठी राज्यात खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राातील गोदामे आहेत. परंतु, या पायाभूत सुविधांची एकूण क्षमता आणि विभागवार उपलब्धता यात असमतोल आहे. त्याकरिता शेतकऱ्यांना उत्पादन क्षेत्राजवळ साठवणूक व्यवस्था उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

तसेच राज्यात ३०४० नोंदणीकृत अन्नप्रक्रिया उद्योग असून एकुण औपचारीक कामगार संख्येपैकी १५ टक्के कामगार अन्नप्रक्रिया उद्योगात आहेत. राज्यात ३ मेगा फुड पार्क, ६ अन्न प्रक्रिया समूह, ६ फुड पार्क , औद्योगिक क्षेत्रे आणि १ विशेष आर्थिक क्षेत्र अस्तित्वात आहे. याशिवाय २००० हुन अधिक शेतकरी उत्पादक कंपन्या, ३.५६ लाख महिला बचत गट आणि त्यांचे संघ तयार करण्यात आले असून त्यांच्या माध्यमातुन विविध प्रकारच्या शेतमालाची मुल्यवृध्दी करण्यात येते. या सर्व प्रकल्प व योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाने केलेल्या प्रयत्नांच्या परिणामी राज्यात जे सामाजिक भांडवल आणि पायाभुत सुविधा निर्माण होत आहेत, त्यांच्या आधारे देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेतील संधींचा लाभ शेतकऱ्यांना मिळवुन देऊन शेतीतून अधिकाधिक नफा मिळवून देण्यासाठी नियोजनबद्ध व संघटीत प्रयत्नांची आवश्यकता असल्याने जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (State of Maharashtra॰s Agribusiness and Rural Transformation Project) राबविण्यास मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पाद्वारे राज्यातील कृषी पूरक उत्पादनांसाठी तसेच, विविध पिकांसाठी काढणी पश्चात हाताळणी व्यवस्थापन, शेतमाल प्रक्रिया उद्योग उभारणी व बाजार जोडणी व्यवस्था निर्माण करुन राज्यात कार्यक्षम व सर्वसमावेशी -एकात्मिक मूल्य साखळी॰ उभारणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी राज्यातील ५० महत्वाच्या पिकांची यादी तयार करण्यात आली असून या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या, गट,महिला बचत गट, स्वयं सहाय्यता गट, फेडरेशन्स, संघ, सहकारी संस्था, सोसायट्या इ. माध्यमातून संघटीत झालेल्या शेतकऱ्यांच्या संस्थांना -मूल्य साखळी प्रकल्प॰ उभारण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार असून या प्रकल्पांतर्गत २१०० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ७० टक्के निधी जागतिक बँकेकडून अल्प व्याज दारात कर्ज स्वरुपात तर २६.६७ टक्के निधी राज्य शासनाच्या स्वनिधीतून तर ३.३३ टक्के निधी खाजगी क्षेत्राच्या सहभागातून ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशनच्या माध्यमात उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) संस्था स्थापन करण्यात येणार असून प्रकल्पांतर्गत कृषी विभाग मुख्य समन्वयक विभाग असून पशुसंवर्धन,

सहकार, पणन, महिला व बालविकास विभाग, ग्रामविकास विभाग व नगर विकास विभाग सहभागी विभाग आहेत.

-----o-----

पदूम विभाग

## विदर्भ, मराठवाड्यातील १९ जिल्ह्यात कुक्कुट विकासाचा कार्यक्रम राबविणार

विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमाच्या अंमलबजावणीअंतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागातील १९ जिल्ह्यांमध्ये प्रति जिल्हा १०० बचतगटातील एकूण एक हजार लाभार्थी याप्रमाणे १९००० लाभार्थ्यांना अंड्यावरील कोंबड्यांचे गट वाटप करणे आणि कुक्कुट विकासाचे निर्धारित उपक्रम राबवण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयानुसार विदर्भ,मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकास उपाययोजनांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत या विभागांतील १९ जिल्हातील प्रत्येकी १००० लाभार्थ्यांना सुधारित देशी जातीच्या १०० कोंबड्यांचा ५० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली असून वाशिम, यवतमाळ, हिंगोली अमरावती आणि नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये कुक्कुटपालन विषयक विविध उपक्रम राबवण्यासाठी या योजनेंतर्गत २६.५० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.
ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासह परसातील कुक्कुट पालनास चालना देवून देशी अंडी उत्पादन वाढवणे तसेच ग्रामीण व शहरी भागात अंडी व मासांची उपलब्धता वाढवणे हा या योजनेचा उद्देश आहे.

सद्यस्थितीत राज्याची दैनंदिन अंड्यांची गरज भागविण्यासाठी नजीकच्या राज्यांमधून दैनंदिन अंडीचा पुरवठा होत आहे. या १९ जिल्ह्यांसाठी प्रस्तावित परसातील कुक्कुट पालन योजनेची अंमलबजावणी केल्यामुळे राज्याची काही प्रमाणातील दैनंदिन अंड्यांची गरज भागविण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे. ही योजना क्लस्टर स्वरुपात राबवण्यात येणार असून एका ग्राम समूहात क्लस्टर पद्धतीने किमान ५ ते कमाल १० बचत गटांची निवड करुन त्यांच्या सदस्यांना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत किमान १० टक्के लाभार्थी अनुसूचित जातीचे आणि ७ टक्के लाभार्थी अनुसूचित जमातीचे निवड केली जाणार असून महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रती लाभार्थी वाटप करण्यात येणाऱ्या १०० कोंबड्यांपासून दरमहा ११,२५० रुपये उत्पन्न मिळणे अपेक्षित असल्याने यामधून ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होणार आहे. वाशीम, यवतमाळ, हिंगोली, अमरावती,नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर,गडचिरोली व गोंदिया या जिल्ह्यांतील १०,००० लाभार्थ्यांना पक्ष्यांसाठी संरक्षक भिंत उभारण्यासाठी ५००० रुपयांचे अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली तसेच नागपूर येथील मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्राच्या बळकटीकरणासाठी २.५० कोटी खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली.

-----o-----

**शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये**
**एका व्यक्तीस एकच घर मिळण्यासाठी धोरण**

राज्यातील कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेमध्ये एका व्यक्तीस एकच घर मिळण्यासाठी धोरण आखण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या धोरणानुसार राज्यातील कोणत्याही व्यक्तीस अथवा त्याच्या कुटुंबीयांस राज्यातील कोणत्याही भागात कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत यापूर्वी घर वाटप झाले असल्यास यापुढे अशा व्यक्तीस किंवा त्याच्या कुटुंबीयांना शासकीय योजनेतून दुसरे घर वाटप करता येणार नाही. या धोरणानुसार कुटुंब म्हणजे संबंधित व्यक्तीची पत्नी किंवा पती तसेच त्याची अज्ञान मुले यांचा समावेश होतो. शासनाच्या या धोरणातील तरतुदी विचारात घेऊन संबंधित विभाग, प्राधिकरण, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून संबंधित कायदा, नियम आणि धोरणामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा-बदल करण्याची कार्यवाही तातडीने केली जाणार आहे.

इमारती किंवा चाळीच्या पुनर्विकासामुळे मुळ घराच्या बदल्यात मोफत किंवा सवलतीच्या दरात एक किंवा अनेक घरे मिळत असल्यास त्यांना या धोरणाचा प्रतिबंध होणार नाही. पुनर्विकासात अशी घरे मिळाल्यानंतर त्यांना अन्य कोणत्याही शासकीय योजनेत सदनिका मिळणार नाही. मात्र, शासकीय गृहनिर्माण योजनेतील घर असलेल्यांना शासनाच्या आणखी चांगल्या योजनेत (up-gradation to better tenement) किंवा सध्याच्या घरापेक्षा मोठे घर घ्यावयाचे असल्यास आधीचे घर शासनाच्या संबंधित प्राधिकरण किंवा संस्थेस दोन महिन्यांत परत करणे अनिवार्य असून संबंधित प्राधिकरणाने पुढील प्रक्रिया त्यानंतरच्या एक महिन्यात पूर्ण करणे आवश्यक राहणार आहे. परत करावयाच्या घराचे मुल्य संबंधित प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येणार असून ते घराच्या मूळ किंमतीपेक्षा कमी असता कामा नये, परंतु सध्याच्या बाजारभावापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

अधिक चांगल्या योजनेतील घरासाठी किंवा मोठ्या आकाराच्या घरासाठी अर्ज करताना स्वत:च्या अथवा कुटुंबीयांच्या नावे असलेल्या शासकीय योजनेतील घराचा उल्लेख करणे आवश्यक राहणार आहे. तसेच संबंधित प्राधिकरणास या योजनेच्या अटी-शर्तींमध्ये व अर्ज नमुन्यामध्ये याबाबत उल्लेख करणे आवश्यक राहणार आहे. अर्ज केल्यानंतर पूर्वीचे घर प्राधिकरणास परत करण्याऐवजी बाजारभावाने विकल्यास तसेच नातेवाईकांच्या किंवा इतर व्यक्तीच्या नावे बक्षीस म्हणून केल्यास किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरित केल्यास संबंधित व्यक्ती नवीन घर वाटप करण्यास अपात्र ठरणार आहे.

आजचे धोरण पूर्वलक्षी प्रभावाने लागू होणार नसले तरी धोरण अंमलात येण्यापूर्वीच्या प्रकरणात एखाद्या शासकीय गृहनिर्माण योजनेत सदस्यांची पात्रता निश्चित करण्यात आलेली असल्यास मात्र, अद्याप प्रत्यक्ष ताबा दिलेला नसल्यास अशा प्रकरणांतही या धोरणाच्या तरतुदी लागू होणार आहेत. एखादी व्यक्ती किंवा कूटुंबीयांच्या नावे आधीपासून शासकीय योजनेतील घर असल्याची बाब लपवून ठेवली गेल्यास किंवा चुकीची माहिती देऊन नवीन घर मिळवून त्याचा ताबा घेतल्यास नवीन घराचे वितरण रद्द करण्यात येणार आहे.

-----०-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अध्यादेश २०१९ ला मान्यता

महाराष्ट्र परिचारिका अधिनियम १९६६ मध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अध्यादेश २०१९ लागू करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील परिचारिकांची नोंदणी व प्रशिक्षण यांचे विनियमन करणाऱ्या विधिंचे एकत्रिकरण करण्यासाठी महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ राज्यामध्ये लागू केला आहे. या अधिनियमाच्या कलम ३ प्रमाणे परिषदेची प्रस्थापना करण्यात येते. राज्यातील नोंदणीकृत परिचारिका संवर्गातील विहित पध्दतीने निवडून आलेल्या व्यक्ती आणि शासन नामनिर्देशित व्यक्तींची मिळून परिषदेची संरचना करण्यात आली आहे.

नंतरच्या काळात राज्यातील पदविकास्तरीय शुश्रूषा व परावैद्यक शिक्षणासंबंधीच्या बाबींचे नियमन करण्यासाठी १ सप्टेंबर, २०१८ च्या अधिसूचनेन्वये राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ स्थापित करण्यात आले आहे. त्यामुळे आता पदविका संस्थांना मान्यता किंवा संलग्नता देणे व परिक्षा विषयक कामकाज परिचारिका परिषदेकडून नव्याने स्थापित झालेल्या मंडळाकडे वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे परिचर्या परिषदेकडे फक्त परिचारिकांच्या नोंदणीचे कामकाज राहीले आहे. त्यामुळे परिषदेवर राज्यातील परिचारिकांव्यतिरिक्त अन्य जास्त सदस्यांची आवश्यकता नाही. तसेच परिचर्या व्यवसायाच्या हिताच्या दृष्टीने या परिषदेवर परिचारिकांना जास्तीत जास्त प्रतिनिधीत्व देणे आवश्यक असल्याने परिषदेच्या संरचनेमध्ये बदल करणे आवश्यक झाले आहे. तसेच या अधिनियमातील विविध कलमांत नोंदणी फी, सदस्यत्वाची अनर्हता, दंडाच्या रक्कमा, शिक्षा इत्यादींच्या तरतुदी करण्यात आल्या आहे. या तरतुदी अत्यंत जुन्या असल्याने त्यात काळानुरूप सुधारणा करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत परिषदेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. परिचारीकांना परिषदेमध्ये पुरेशे प्रतिनिधीत्व देण्यासाठी आणि परिचरीका व्यवसायाच्या हितासाठी अध्यादेश प्रख्यापित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र परिचारीका अधिनियम १९६६ मधील संबंधित कलमांत सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

जलसंपदा विभाग

## वाघूर प्रकल्पास मिळणार जास्तीचा निधी

जळगाव जिल्ह्यातील वाघूर प्रकल्पास २०१७-१८ च्या दरसूचीनुसार २ हजार २८८ कोटींची सातवी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याने या प्रकल्पाला जास्तीचा निधी प्राप्त होणार आहे. या नवीन मान्यतेमुळे जळगाव, भुसावळ, जामनेर तालुक्यातील ३६ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

यामध्ये जळगाव तालुक्यातील १५ हजार ३८२ हेक्टर, भुसावळ तालुक्यातील १ हजार ५९६ हेक्टर आणि जामनेर तालुक्यातील अवर्षण भागातील वाघूर उपसा सिंचन योजना क्र.१ द्वारे १० हजार १०० हेक्टर तसेच उपसा सिंचन क्र.२ द्वारे ९ हजार ३२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. प्रकल्पाचे क्षेत्र हे अवर्षण क्षेत्रात मोडत असून प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत करण्यात आला आहे.

-----०-----

जलसंपदा विभाग

## हतनूर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यास
## चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता

जळगाव जिल्ह्याच्या भुसावळ तालुक्यातील उर्ध्व तापी टप्पा-१ (हतनूर) प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यास २०१६-१७ च्या दरसूचीनुसार ५३६ कोटींची चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. या प्रकल्पामुळे रावेर, यावल, चोपडा तालुक्यातील १२४ गावातील ३७ हजार ८३८ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार आहे.

या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात यावल तालुक्याच्या ४१ गावांतील १० हजार ३०० हेक्टर, चोपडा तालुक्याच्या ७२ गावातील २६ हजार हेक्टर आणि रावेर तालुक्याच्या ११ गावातील १ हजार ५०० हेक्टर क्षेत्राचा समावेश असणार आहे.

-----o-----

जलसंपदा विभाग

## वरणगांव तळवेल परिसर सिंचन योजनेस
## पहिली सुधारीत प्रशासकीय मान्यता

जळगाव जिल्ह्यातील वरणगांव तळवेल परिसर सिंचन योजनेस २०१३-१४ च्या दरसूचीनुसार ८६१ कोटींची पहिली सुधारीत प्रशासकीय मान्यता आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली.

या प्रकल्पांतर्गत हतनूर प्रकल्पाच्या जलाशयातून १२४.४१९ दलघमी पाणी उपसा करुन त्यापैकी पहिल्या टप्प्यात उपसाद्वारे १४.४९ दलघमी पाण्याने ३६९० हेक्टर सिंचनक्षेत्र बंदिस्त पाईपलाईनद्वारे सिंचित करणे व उर्वरित १०९.९२९ दलघमी दुसऱ्या टप्प्यात उपसा करुन ते हतनूर धरणापासून ९ किमी अंतरावरील एका नाल्यावर ओझरखेडा धरणामध्ये सोडण्याचे प्रस्तावित आहे. याद्वारे बंदिस्त पाईपलाईनद्वारे १३,२५८ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करणे असे एकूण १६ हजार ९४८ हेक्टर सिंचन क्षेत्र प्रस्तावित आहे. यामध्ये जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील ११ हजार ६०६ हेक्टर, बोदवड तालुक्यातील ३९८४ हेक्टर आणि मुक्ताईनगर तालुक्यातील १३५८ हेक्टर सिंचन क्षेत्राचा समावेश आहे.

-----o-----

जलसंपदा विभाग

## भातसा प्रकल्पास १४९१ कोटींची
## सुधारित प्रशासकीय मान्यता

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील भातसा प्रकल्पास २०१७-१८ च्या दरसूचीनुसार १ हजार ४९१ कोटींची सहावी सुधारीत प्रशासकीय मान्यता आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली.

भातसा प्रकल्पांतर्गत भातसा नदीवर धरण बांधणे, मुमरी नदीवर शहापूर तालुक्यातील सारंगपूरी येथे मुमरी धरण बांधणे, भातसा उजवा व डावा कालवा बांधणे आणि १५ मेगावॅट वीज निर्मितीसाठी विद्युतगृह बांधणे प्रस्तावित आहे.

दरम्यान एकात्मिक राज्य जल आराखड्यानुसार प्रकल्पाचा पाणीवापर ७१६.१२ द.ल.घ.मी. इतका असून बिगर सिंचन पाणी आरक्षण ७५५.४८ द.ल.घ.मी. इतके आहे. त्यामुळे सहाव्या मान्यतेमध्ये पाण्याची उपलब्धता झाल्यास डावा कालवा १७ किमी पर्यंत करण्याचे प्रस्तवित करण्यात आले आहे. तसेच उर्वरित कालवे व वितरण व्यवस्थेची कामे वगळण्यात आली आहेत. त्यामुळे प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र ९१९० हेक्टर इतके प्रस्तावित करण्यात आले आहे.

-----o-----

जलसंपदा विभाग

## शेळगाव बॅरेज प्रकल्पास दुसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता

जळगाव जिल्ह्यातील शेळगाव बॅरेज प्रकल्पास २०१६-१७ च्या दरसूचीनुसार ९६८ कोटींची दुसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. या प्रकल्पामुळे यावल तालुक्यातील १९ गावांतील ९ हजार १२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

या प्रकल्पाचा संकल्पीय पाणीसाठा ११६ दशलक्ष घनमीटर एवढा असणार आहे. या प्रकल्पाचे क्षेत्र हे डार्क झोन मध्ये मोडत असून त्याचा समावेश बळीराजा जलसंजीवनी योजनेत करण्यात आला आहे.

-----०-----

महसूल विभाग

## चिमूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय

प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर, सिंदेवाही, नागभिड व ब्रम्हपूरी हे तालुके जिल्हा मुख्यालयापासून दूर अंतरावर आहेत. जिल्हा मुख्यालयापासून असलेले अंतर आणि भौगोलिकदृष्ट्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा हरित पट्टा यामुळे चंद्रपूर जिल्हा दोन भागात विभागला आहे. जिल्हाधिकारी स्तरावरील प्रशासकीय कार्यासाठी वारंवार सुरु असलेली पायपिट आणि वेळेअभावी विकासकामे प्रलंबित असल्याने तेथील स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींकडून चिमूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय निर्माण करण्याची मागणी होत होती. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे चिमूर, सिंदेवाही, ब्रम्हपूरी आणि नागभीड या चार तालुक्यांतील ५.७९ लाख लोकांना प्रशासकीय कामकाजासाठी चंद्रपूर येथे मुख्यालयापर्यंत जाण्याची आवश्यकता राहणार नाही. यासाठी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांसह एकूण सहा पदांना मान्यता देण्यात आली.

यापूर्वी प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने पालघर जिल्ह्यातील जव्हार, नाशिक जिल्ह्यातील मालेगाव, गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तसेच बीड जिल्ह्यातील अंबेजागाई येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## औरंगाबाद व संगमनेरमधील विधि महाविद्यालयांना अनुदान मंजूर

नवलनगर (जि. धुळे) येथील नवलभाऊ प्रतिष्ठान संचलित औरंगाबादमधील विधि महाविद्यालय आणि संगमनेर (जि. अहमदनगर) येथील श्री. शिक्षण प्रसारक संस्था संचलित ओमकारनाथ मालपाणी विधि महाविद्यालय या दोन महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ८ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयामधील कार्यपद्धतीनुसार अनुदानाची परिगणना करण्यात येणार आहे.

-----०-----

## अन्न सुरक्षा आयुक्तांच्या निर्णयावर दुसरे अपील शासनाकडे करता येणार

अन्नपदार्थांशी संबंधित व्यावसायिकांना त्यांचा परवाना रद्द अथवा निलंबनाच्या अन्न सुरक्षा आयुक्तांच्या निर्णयावर राज्य शासनाकडेच दुसरे अपील करता यावे यासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमने २०११ मधील कलम ३२ (४) (c) मध्ये सुधारणा करणेबाबतचे विधेयक विधानमंडळासमोर सादर करणेबाबतचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमने २०११ ची अंमलबजावणी राज्याच्या अन्न व औषध प्रशासनातर्फे केली जाते. अन्न सुरक्षा अधिकारी अन्नपदार्थ विक्रीसाठी उत्पादित होतो अथवा साठविला जातो तेथे तपासणी करुन पदावधित अधिकाऱ्यांना अहवाल सादर करतात. पदावधित अधिकाऱ्यांना अहवालात जर संबंधित अन्न आस्थापना, कायद्यातील तरतुदीचे पालन करीत नसल्याचे आढळले तर अन्न आस्थापनेस नोटीस जारी करण्यात येते. सुधारणा नोटीस देऊनही अन्न आस्थापनेने त्रुटी दूर केल्या नाहीत तर आस्थापनेचा परवाना निलंबित अथवा रद्द करु शकतात. या विरोधात अन्न सुरक्षा आयुक्तांकडे अपील करु शकतो. या अपिलावर अन्न सुरक्षा आयुक्तांनी दिलेला निर्णय अंतिम असतो. अन्न व्यवसाय चालकास निर्णय मान्य नसल्यास त्याला दुरारा पर्याय नसल्याने तो थेट उच्च न्यायालयात दाद मागू शकतो. अन्न व्यवसायात असलेले ५० टक्क्यांहून अधिक व्यावसायिक कमी शिक्षित असलेले व उदरनिर्वाहाचे साधन म्हणून छोटा मोठा व्यवसाय करणारे आहेत. परंतु सर्वसामान्य अन्न व्यवसाय चालकास वकिलांचे शुल्क व इतर खर्च परवडणारा नसतो. या बाबींचा विचार करून व्दितीय अपील उच्च न्यायालयात दाखल न होता ते शासनस्तरावर करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. आयुक्तांनी दिलेल्या अपिलावरील निर्णयावर विभागाच्या मंत्र्यांकडे व्दितीय अपील दाखल करुन पुनर्विलोकन करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठीअन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमने २०११ मधील कलम ३२ (४) (c) मध्ये सुधारणा करणेबाबतचे विधेयक विधानमंडळासमोर सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----



## दिव्यांगांच्या खाजगी प्रशिक्षण संस्थांना मिळणार एकवेळचे अनुदान

दिव्यांगांकरिता सुरू करण्यात येणाऱ्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस वेतन अनुदानासह यंत्रसामग्री व इतर साधनसामग्री खरेदी यासाठी एकवेळचे अनुदान मंजूर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

दिव्यांगांसाठी राज्यात स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था अस्तित्वात नाही. सध्या विद्यमान शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून दिव्यांगांच्या प्रवेशासाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या चार टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. दिव्यांगांची राज्यातील संख्या विचारात घेता त्यांच्याकरिता त्या प्रमाणात व्यवसाय प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना दिव्यांगाकरिता व्यवसाय प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. यासाठी दिव्यांगांकरिता सुरू करण्यात येणाऱ्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस वेतन अनुदान व यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीकरिता एक वेळचे अनुदान मंजूर करण्याचे विचाराधीन होते. त्यानुसार आज निर्णय घेण्यात आला.

दिव्यांग विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये योग्य समावेशन व्हावे व कौशल्य शिक्षणाची अनुरुप संधी प्राप्त व्हावी या हेतूने शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये १०० टक्के प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देण्यात आली. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अनुज्ञेय असलेल्या प्रशिक्षण शुल्काच्या २० टक्के प्रोत्साहनात्मक रक्कम शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच फक्त दिव्यांगाकरिता सुरू करण्यात येणाऱ्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी कमाल एक कोटी मर्यादेमध्ये एक वेळचे अनुदान विभागाच्या उपलब्ध नियतव्ययातून देण्यास मान्यता देण्यात येणार आहे. दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांकरिता प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्यासंदर्भात प्रतिवर्षी ११.८१ कोटी रुपये अतिरिक्त निधी २०१९-२० या आर्थिक वर्षापासून मंजूर करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## दीर्घकाळ शासकीय वैद्यकीय सेवा देऊ इच्छिणाऱ्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश आरक्षण

शासकीय वैद्यकीय सेवेमध्ये दीर्घकाळ काम करण्यास इच्छूक असलेल्या उमेदवारांना शासकीय तसेच महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेशात आरक्षण देण्यासाठी विधानमंडळात विधेयक मांडण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यामध्ये शासकीय रुग्णालयात विविध विभागांमध्ये वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांची कमतरता असल्याने त्याचा रुग्णसेवेवर परिणाम जाणवतो. शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर व पदवीपूर्व विद्यार्थी यांनी बंधपत्रित सेवा पुरविणे आवश्यक आहे. असे असले तरी त्यांच्या सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. तसेच बाँड लिहून देणारे (बंधपत्रित) उमेदवारदेखील ग्रामीण, डोंगराळ व दुर्गम भागात वैद्यकीय सेवा देण्यासाठी फारसे उत्सुक नसतात. पुणे येथील Armed Forces Medical College या महाविद्यालयाद्वारे वैद्यकीय पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविले जातात. या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांनी ठराविक वर्षांच्या कालावधीसाठी संरक्षण दलातील वैद्यकीय सेवेमध्ये कार्यरत राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्या धर्तीवर, पुरेशी रुग्णसेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून राज्यातील आरोग्य व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करण्याचा मानस आहे. त्यासाठी शासकीय सेवेमध्ये दीर्घकाळ काम करु इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी शासकीय तसेच महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशाच्या वेळी ठराविक प्रमाणात जागा राखीव अथवा आरक्षित ठेवल्यास राज्यामध्ये शासकीय रुग्णालयात विविध विभागांमध्ये वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ उपलब्ध होऊ शकतात. यासाठी Maharashtra Designation of Certain Seats in Government and Municipal Corporations Medical Colleges Bill हे विधेयक विधानमंडळास सादर करण्यात येणार आहे. या विधेयकाच्या प्रारूपाला काही अनुषंगिक बदलासह मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली आहे.

राज्यामध्ये नवीन कायदा करुन शासकीय, महापालिका वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशाच्या वेळी काही ठराविक जागा आरक्षित ठेवण्यात येतील. या योजनेंतर्गत प्रवेशित उमेदवारांना किमान कालावधीसाठी शासकीय रुग्णालयात सेवा देणे बंधनकारक असेल. यामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी १० टक्के राखीव जागा ठेवण्यात येणार असून त्यामधून प्रवेश घेणाऱ्यांना ५ वर्ष तर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी २० टक्के राखीव जागा ठेवण्यात येणार असून त्यामधून प्रवेश घेणाऱ्यांना ७ वर्ष सेवा द्यावी लागेल. या योजनेत शासकीय रुग्णालयांमध्ये नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात येईल. परिणामी

शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञांची कमतरता काही प्रमाणात दूर करता येईल तसेच शासकीय सेवेत स्वेच्छेने काम करण्यास डॉक्टर्स उपलब्ध होतील.

-----o-----

सार्वजनिक आरोग्य विभाग

**मानसिक आरोग्यासंदर्भातील अभ्यासक्रमांसाठी**
**सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करणार**

बदलत्या जीवनशैलीमुळे मानसिक स्वास्थ्याशी संबंधित निर्माण होत असलेल्या वाढत्या समस्यांवर उपचार करण्यासाठी तज्ज्ञ उपलब्ध होण्याच्या उद्देशाने राज्यातील प्रादेशिक मनोरुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

मानसिक आरोग्याशी संबंधित वाढत्या समस्या लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या धोरणानुसार राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत विशेषज्ञांची उपलब्धता वाढण्यासाठी उपाययोजना सूचविण्यात आल्या आहेत. त्याअंतर्गत मानसिक आरोग्याचे बळकटीकरण करुन राज्याला प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येणार असून राज्यातील मानसिक आरोग्य सेवेशी संबंधित तज्ज्ञ मनुष्यबळ व निमवैद्यकीय मनुष्यबळ उपलब्ध होणार असल्याने अधिकाधिक लोकांना मानसिक आरोग्य सेवेचा लाभ प्राप्त होणार आहे. यानुसार प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे, ठाणे व नागपूर येथे सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यासाठी ५.७४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून राज्यात एमडी सायकिअॅट्रीच्या चार जागा, एमफील (क्लिनीकल सायकॉलॉजी) १६ जागा,एमफील (सायकियाट्रिक सोशल वर्कर) १६ जागा, डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग- ४० जागा याप्रमाणे पुणे,ठाणे आणि नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय-प्रादेशिक मनोरुग्णालयांत जागा निर्माण होणार आहेत. या अभ्यासक्रमासाठी येणाऱ्या एकूण खर्चापैकी ६० टक्के अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून प्राप्त होणार असून उर्वरित ४०टक्के खर्च राज्य शासनामार्फत करण्यात येणार आहे.

-----o-----

नगर विकास विभाग

**जयताळा येथील आरक्षण फेरबदलास मंजुरी**

नागपूर महानगरपालिका हद्दीतील जयताळामधील खसरा क्रमांक ७ (भाग) मधील १.२२ हेक्टर जागेवरील आरक्षण वगळून त्या जागेचा वापर सार्वजनिक-निमसार्वजनिक विभागात करण्याच्या फेरबदल प्रस्तावास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मौजे जयताळामधील खसरा क्रमांक ७ (भाग) यातील १.२२ हेक्टर जागेवर एक्सटेंशन टू एनएमसी नाका (एमडब्ल्यू २३) हे आरक्षण वगळून या जागेचा वापर सार्वजनिक-निमसार्वजनिक विभागात करण्याचा फेरबदल प्रस्ताव महानगरपालिकेने सादर केला होता. त्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. धर्मादाय संस्था म्हणून व आरोग्य क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करीत असलेल्या अर्जदार संस्थेची विनंती मान्य करुन हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, अशा फेरबदल प्रस्तावावर ५ टक्के अधिमूल्य आकारणे आवश्यक असते. पैकी ५० टक्के स्थानिक स्वराज्य संस्थेकडे तर ५० टक्के शासनाकडे भरले जाणे आवश्यक आहे. हे लक्षात घेता, फेरबदलाची विनंती मान्य करतानाच शासनाच्या हिश्श्याचे ५० टक्के अधिमूल्य (७७ लाख १६ हजार ५०० रुपये) रकमेस सूट देण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

-----o-----

मदत व पुनर्वसन विभाग

**विस्थापित वसाहतीतील निवासी, वाणिज्यिक हस्तांतरणे**
**नियमानुकूल करण्याबाबत मंत्रिमंडळ उपसमिती**

मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील विस्थापित वसाहतींमध्ये अवैधपणे झालेली निवासी, वाणिज्यिक हस्तांतरणे नियमानुकूल करण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी महसूल मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

फाळणीनंतर भारतामध्ये स्थलांतर केलेल्या नागरिकांचे विविध वसाहती निर्माण करुन पुनर्वसन करण्यात आले आहे. मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातही अशा विस्थापित वसाहती आहेत. या वसाहतीत विस्थापितांकडून अन्य विस्थापितांना व बिगर विस्थापितांना सदनिका, बैठी घरे, बॅरॅक्समधील खोल्या, वाणिज्यिक औद्योगिक गाळे यांची विक्री, बक्षीसपत्र किंवा दानपत्र इत्यादींद्वारे अवैध हस्तांतरणे झाली आहेत. हस्तांतरण शुल्क आकारुन ही हस्तांतरणे आजपर्यंत राहणाऱ्या पात्र व्यक्तिंच्या नावे, शर्त भंग नियमानुकूल करण्याची कार्यपद्धती ठरविण्यासाठी व त्यानुसार अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामध्ये महसूल मंत्री हे या समितीचे अध्यक्ष असतील. तर शालेय शिक्षण, उद्योग, उच्च व तंत्रशिक्षण या विभागांचे मंत्री तसेच नगरविकास विभागाचे राज्यमंत्री हे समितीचे सदस्य तर आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव हे सदस्य सचिव असतील.

-----०-----

जलसंपदा विभाग

**देहरजी मध्यम प्रकल्प एमएमआरडीएच्या अर्थसहाय्यातून राबविणार**

पालघर जिल्ह्याच्या विक्रमगड तालुक्यातील देहरजी मध्यम प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) अर्थसहाय्यातून राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

देहरजी प्रकल्पाच्या माध्यमातून एमएमआरडीएला ९३.२२ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध होणार असून यामुळे पालघर जिल्ह्यातील महापालिका आणि गावांच्या पिण्याच्या पाण्यासह औद्योगिक वापरासाठीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. यापूर्वी ४ मार्च २०१४ च्या शासन निर्णयानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी या प्रकल्पातून पाणी आरक्षित करण्यासह प्रकल्पाचा संपूर्ण खर्च भांडवली अंशदान म्हणून या महापालिकेकडून घेण्यात येणार होता. तसेच त्याची अंमलबजावणी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडून करण्यास मान्यता देण्यात आली होती.

दरम्यानच्या काळात दरसूचीतील बदल, भूसंपादन खर्चातील वाढ, प्रकल्पाच्या आराखड्यातील बदल इत्यादी कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. वाढीव किंमतीनुसार वसई विरार महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही. यामुळे देहरजी प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसहाय्यातून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----